# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः17.08.2025** **वारःरविवार**

---

१.पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत दोन प्रमुख राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचं उद्घाटन करणार
२. वर्तमान आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स निर्यातीत ४७ टक्क्यांहून अधिक वाढ
३. चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी उद्यापासून दोन दिवसांच्या भारत भेटीवर, भारत-चीन सीमाप्रश्नी चर्चेत सहभागी होणार
४. अलास्कामध्ये रशियाचे अध्यक्ष पुतीन यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भूमिकेत मोठा बदल, युक्रेनला तडजोडीनं युद्ध संपवण्याचं आवाहन आणि
५. भारतीय बॅडमिंटनपटू तान्या हेमंतला यंदाच्या सायपन आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये महिला एकेरीचा मुकुट

**मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत सुमारे ११ हजार कोटी रुपयांच्या दोन प्रमुख राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचं उद्घाटन करणार आहेत. या प्रकल्पांमध्ये द्वारका एक्सप्रेसवेचा दिल्लीतला भाग आणि अर्बन एक्सटेंशन रोडचा दुसरा भाग समाविष्ट आहे. पंतप्रधान यावेळी एका जाहीर सभेलाही संबोधित करतील.

**इलेक्ट्रॉनिक्स**

आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या पहिल्या तिमाहीत भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स निर्यातीत गेल्या वर्षीच्या याच तिमाहीच्या तुलनेत ४७ टक्क्यांहून अधिक वाढ झाल्याची माहिती वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी दिली आहे. मेक इन इंडिया उपक्रमामुळे इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनात २०१४-१५ पासूनच्या दशकात आतापर्यंत ३१ अब्ज डॉलर्सवरून १३३ अब्ज डॉलर्सपर्यंत जलद गतीनं वाढ झाली आहे. सरकारने उत्पादन क्षेत्रात भारताला स्वावलंबी बनवण्यासाठी अनेक प्रयत्न केले आहेत. २०१४ मध्ये भारतात केवळ दोन मोबाईल उत्पादन कारखाने होते, मात्र आज ही संख्या तीनशेहून अधिक झाली आहे, असं गोयल यांनी सांगितलं. मोबाइल आयातदार ते जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा मोबाइल फोन उत्पादक बनण्याचा बदल हा एक मोठा प्रवास आहे असं ते म्हणाले.

**जयशंकर**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी काल नवी दिल्लीत त्यांचे दक्षिण कोरियाचे समपदस्थ चो ह्यून यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. व्यापार, उत्पादन, सागरी क्षेत्र, नागरिकांचे परस्पर संबंध या क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्य आणखी पुढे नेण्याच्या उद्देशानं झालेल्या बैठकीत दोघांमध्ये फलदायी चर्चा झाल्याची माहिती जयशंकर यांनी समाज माध्यमावरील संदेशाद्वारे दिली आहे. कृत्रिम प्रज्ञा, सेमी कंडक्टर्स, स्वच्छ ऊर्जा आणि संरक्षण यांसारख्या उदयास येत असलेल्या नवीन क्षेत्रातील संधींबाबतही त्यांनी चर्चा केली, तसंच हिंद-प्रशांत क्षेत्र आणि जागतिक पातळीवरील सध्याच्या नव्या घडामोडींबाबतही त्यांनी आपले दृष्टिकोन व्यक्त केल्याचं जयशंकर यांनी नमूद केलं आहे.

**<u>चीनपरराष्ट्रमंत्री</u>**

चीनचे परराष्ट्र मंत्री आणि चीनच्या कम्युनिस्ट पार्टीच्या पॉलिट ब्युरोचे सदस्य वांग यी उद्यापासून दोन दिवसांच्या भारत भेटीवर येणार आहेत. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांच्या निमंत्रणावरून ते भारत दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या या भेटीत ते भारत-चीन सीमाप्रश्नी दोन्ही देशांच्या विशेष प्रतिनिधींच्या चर्चेच्या २४ व्या फेरीत सहभागी होणार आहेत.  या चर्चेत अजित डोभाल भारताचे प्रतिनिधी म्हणून सहभागी होतील. वांग यी  परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांच्यासमवेतही द्विपक्षीय बैठक घेणार आहेत.

**<u>मिस्री नेपाळ</u>**

परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री त्यांचे नेपाळचे समपदस्थ अमृत बहादूर राय यांच्या निमंत्रणावरून आजपासून नेपाळच्या दोन दिवसांच्या अधिकृत दौऱ्यावर जाणार आहेत. परराष्ट्र सचिवांचा हा नियोजित नेपाळ दौरा दोन्ही देशांमधील नियमित उच्चस्तरीय देवाणघेवाणीचा एक भाग असून तो द्विपक्षीय संबंधांना आणखी पुढे नेण्याची संधी असेल असं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>पुतीनसमिट</u>**

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेण्यासाठी केलेला अलास्का दौरा योग्य वेळी झाल्याचं आणि उपयुक्त ठरला असल्याचं म्हटलं आहे. युक्रेन संघर्षाबाबत या शिखर परिषदेत झालेल्या अतिशय स्पष्ट आणि ठोस चर्चेमुळे रशिया निश्चित निर्णयाप्रत पोहोचला असल्याचं पुतीन यांनी क्रेमलिन इथं त्यांच्या मंत्रिमंडळाला आणि इतर अधिकाऱ्यांना चर्चेसंदर्भात माहिती देताना सांगितलं. युक्रेन युद्ध शक्य तितक्या लवकर संपवण्याची आणि सर्व समस्या सोडवण्याची अध्यक्ष ट्रम्प यांनी व्यक्त केलेली इच्छा त्यांनी मान्य केली. युक्रेन संघर्षावर निष्पक्षपणे संभाव्य तोडगा काढण्याच्या मुद्द्यावर आपण त्यांच्याशी  बोलल्याचं पुतीन यांनी सांगितलं.

**<u>ट्रम्प-झेलेन्स्की</u>**

दरम्यान रशिया ही महासत्ता असल्यानं त्यापुढे लहान असलेल्या युक्रेननं रशियाशी युद्ध संपवण्याबाबत करार करावा असा सल्ला अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे.  यांनी अध्यक्ष  कारण आहे आणि युक्रेन तसे नाही. पुतीन यांच्यासमवेत झालेल्या शिखर परिषदेनंतर दिलेल्या मुलाखतीत ट्रम्प यांनी युक्रेननं तडजोड करून करार करावा असं आवाहन केलं. युक्रेनच्या वतीने वाटाघाटी करणं नाही तर, दोन्ही

बाजूंना चर्चेसाठी समोरासमोर आणणं अशी आपली भूमिका असल्याचं ट्रम्प यांनी स्पष्ट केलं. अध्यक्ष ट्रम्प यांनी आपल्या पूर्वीच्या भूमिकेत मोठा बदल करत, थेट शांतता करार करणं हा रशिया आणि युक्रेनमधील भयंकर युद्ध संपवण्याचा सर्वोत्तम मार्ग असल्याचं म्हटलं आहे

**<u>केंद्रराष्ट्रपती</u>**

राष्ट्रपती आणि राज्यपालांना विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी कालमर्यादा घालून देणं राज्यघटनेच्या विरोधात आहे, असं उत्तर सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी काल सर्वोच्च न्यायालयात सादर केलं. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निकालाबाबत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाला विचारलेल्या प्रश्नांवर सध्या सुनावणी सुरू आहे. कलम २०० आणि २०१ नुसार अशी कालमर्यादा घालता येत नाही, विधेयकांवर निर्णय घेणं हा राष्ट्रपती आणि राज्यपालांचा अधिकार आहे, असं मेहता यांनी आपल्या उत्तरात म्हटलं आहे.

**<u>भाजपबैठक</u>**

नवी दिल्लीतल्या भाजपा मुख्यालयात आज पक्षाच्या संसदीय मंडळाची बैठक होण्याची अपेक्षा आहे. या बैठकीत उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीबाबत चर्चा होण्याची शक्यता असून, त्यामध्ये संसदीय मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित राहणार असल्याचं पक्षाच्या सूत्रांनी सांगितलं. या महिन्याच्या ६ तारखेला, सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी अर्थात एनडीए तील घटक पक्षांच्या नेत्यांनी उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी एनडीएचा उमेदवार ठरवण्याचे सर्व अधिकार पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांना देण्याचा ठराव एकमतानं संमत केला होता. या निवडणुकीत लोकसभा आणि राज्यसभेच्या सदस्यांद्वारे उपराष्ट्रपतींची निवड केली जाते. दोन्ही सभागृहांमध्ये एनडीएला पुरेसं बहुमत आहे. पुढील महिन्याच्या ९ तारखेला होणाऱ्या उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी येत्या गुरुवारपर्यंत मुदत आहे. ही निवडणूक होणार आहे. जगदीप धनखड यांच्या राजीनाम्यामुळे ही निवडणूक होत आहे.

**<u>अंतराळवीरशुक्ला</u>**

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकला भेट देणारे पहिले भारतीय म्हणून इतिहास घडविणारे अंतराळवीर शुभांशू शुक्ला आज पहाटे मायदेशी परतले. दिल्ली आंतरराष्ट्रीय विमानतळावर त्यांचं केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंग, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि इस्रोचे अध्यक्ष डॉ. व्ही नारायणन यांनी स्वागत केलं. शुक्ला यांचे कुटुंबियही यावेळी त्यांच्या स्वागतासाठी उपस्थित होते. नासाच्या एक्झिओम 4 मोहिमेवरून परतल्यानंतर त्यांचं शरीर पृथ्वीवरील वातावरणात पुन्हा सरावण्याच्या अनुषंगानं अमेरिकेत त्यांचं काही दिवस पुनर्वसन करण्यात आलं, त्यानंतर ते आता भारतात परतले आहेत. २५ जून रोजी केनेडी स्पेस सेंटरवरून त्यांनी अंतराळात झेप घेतली होती.

**<u>नागालँडराज्यपाल</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मणिपूरचे राज्यपाल अजय कुमार भल्ला यांच्याकडे नागालँडच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे.. नागालँडचे राज्यपाल ला. गणेशन यांच्या निधनानंतर, राष्ट्रपतींनी भल्ला यांना राज्यपालपदाची जबाबदारी दिली असल्याचं राष्ट्रपती भवनाच्या एका निवेदनात म्हटलं आहे.

**<u>बॅडमिंटन</u>**

भारतीय बॅडमिंटनपटू तान्या हेमंत हिने काल उत्तर मारियाना बेटांवर झालेल्या २०२५च्या सायपन आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये महिला एकेरीचा मुकुट जिंकला. जागतिक क्रमवारीत ८६ व्या क्रमांकावर असलेल्या अव्वल मानांकित तान्या हेमंतने बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनच्या नव्या गुण निकषांनुसार, अंतिम सामन्यात जपानच्या काने सकाईचा १५-१०, १५-८ असा पराभव केला.

**<u>महाराष्ट्रपाऊस</u>**

येत्या २१ तारखेपर्यंत महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा मुंबईच्या प्रादेशिक हवामान विभागाने जारी केला आहे. या काळात जोरदार वाऱ्यांसह मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असल्याने लोकांनी सावधगिरी बाळगण्याचा इशारा राज्य आपत्ती विभागानं दिला आहे.२० तारखेपर्यंत कोकण किनाऱ्यावर समुद्र खवळण्याची शक्यता असून या काळात मच्छिमारांनी समुद्रात जाऊ नये असा सल्ला देण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागानं आज महाराष्ट्राशिवाय, गोवा आणि तेलंगणा इथे काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला असून उद्या कर्नाटक, मध्य प्रदेश आणि गुजरातमध्ये अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**